# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. 'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयक सुसंगत प्रशासन आणि प्रभावी प्रशासनाच्या दिशेनं परिवर्तनकारी पाऊल असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
2. प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर तसंच ज्येष्ठ दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्मभूषण तर 11 मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

आणि

3. वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारताची इंग्लंडवर विजयी आघाडी

**प्रजासत्ताक दिन**

'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयक सुसंगत प्रशासन आणि प्रभावी प्रशासनाच्या दिशेनं परिवर्तनकारी पाऊल असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला संबोधित करताना त्या बोलत होत्या.भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा यांच्या जागी भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा आणण्याचा निर्णय हा या प्रयत्नांपैकी सर्वात उल्लेखनीय आहे असं सांगून त्या म्हणाल्या की, नवीन कायद्यांनी फौजदारी न्याय व्यवस्थेत शिक्षेऐवजी न्यायाच्या भावनेला केंद्रस्थानी ठेवलं आहे.राष्ट्रपती म्हणाल्या की, गेल्या 75 वर्षांपासून संविधानाने देशाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला आहे.

राष्ट्रपतींनी मातृभूमीला परकीय राजवटीच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी बलिदान देणाऱ्या महान वीरांचे स्मरण केलं.

धाडसी आणि दूरदर्शी आर्थिक सुधारणांच्या बळावर येत्या काळात देशाच्या प्रगतीची गती कायम राहील, असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला.

वित्त क्षेत्रात सरकारद्वारे होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराचं कौतुक करताना त्या म्हणाल्या की डिजिटल पेमेंट पर्याय आणि थेट लाभ हस्तांतरण प्रणालींमुळे समावेशनाला चालना मिळाली आहे आणि भारताची डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा जगातील सर्वोत्तम पायाभूत सुविधांपैकी एक आहे. आपल्या भाषणाच्या अखेरीस राष्ट्रपतींनी देशाच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या सैनिकांबरोबरच देशाला सुरक्षित ठेवणारे पोलिस आणि निम लष्करी जवान यनाही त्यांनी शुभेछा दिल्या.

**प्रजासत्ताक दिन**

संपूर्ण देशभरात आज 76 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु नवी दिल्लीतील कर्तव्य पथावर आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या संचलन सोहोळयाच्या अध्यक्षस्थानी असतील. सशस्त्र सेना, निमलष्करी दल, सहायक नागरी दल, राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या तुकड्यांची सलामी त्या स्वीकारतील. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पहार अर्पण करून होईल. इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो हे संचलनाचे प्रमुख पाहुणे असतील. "स्वर्णिम भारत - विरासत और विकास" या संकल्पनेनुसार तयार करण्यात आलेले, विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांमधील, 31 चित्ररथ, या सोहोळयात सहभागी होणार आहेत. 47 विमानांच्या विविध कसरतीनी या कार्यक्रमाची सांगता होईल.

प्रजासत्ताक दिनाच्या सोहोळयात राष्ट्र आणि समाज उभारणीतील योगदानाचा गौरव करण्यासाठी, देशभरातील सरपंच, हस्तकला आणि हातमाग कारागीर, स्वयंसाह्यता गट सदस्य, आशा आणि अंगणवाडी सेविका, रस्ते बांधकाम कामगार अशा 34 श्रेणीतील दहा हजार विशेष अतिथींना यावेळी आमंत्रित करण्यात आलं आहे.

76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 93शौर्य पुरस्कारांची घोषणा केली आहे. यामध्ये सशस्त्र दल आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, ज्यात 11 मरणोत्तर पुरस्कारांचा समावेश आहे. यामध्ये एक मरणोत्तरसह दोन कीर्ती चक्र, तीन मरणोत्तरसह 14 शौर्य चक्र, एक लष्करी शौर्य पदक, सात मरणोत्तरसह 66 लष्करी पदके, दोन नौदल पदके आणि आठ हवाई दल पदके यांचा समावेश आहे.

मेजर मनजीत आणि नाईक दिलावर खान यांना मरणोत्तर कीर्ती चक्र प्रदान करण्यात आले आहे. कीर्ती चक्र हा धाडसी कृत्ये आणि आत्मत्यागासाठी दिला जातो.

राष्ट्रपतींनी सशस्त्र दल आणि इतर कर्मचाऱ्यांना 305 संरक्षण पदके देण्यासही मान्यता दिली. यामध्ये 30 परम विशिष्ट सेवा पदके, पाच उत्तम युद्ध सेवा पदके, 57 अति विशिष्ट सेवा पदके आणि 10 युद्ध सेवा पदके यांचा समावेश आहे.

**पद्म पुरस्कार**

देशातील सर्वोच्च नागरी पद्म पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातून माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर तसेच ज्येष्ठ दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्म भूषण तर 11 मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत.

कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी सुलेखनकार अच्युत पालव, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, शास्त्रीय गायक अश्विनी भिडे देशपांडे, पार्श्व गायिका जसपिंदर नरुला, ज्येष्ठ बासरी वादक रानेंद्र भानू मजुमदार, आणि ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांना, व्यापार आणि उद्योग क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या अरूंधती भट्टाचार्य यांना तर पर्यावरण आणि वनसंवर्धन करणारे चैत्राम पवार यांना सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे.साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी महाराष्ट्राचे अरण्य ऋषी वन्यजीव अभ्यासक मारोती चीतमपल्ली यांना, तर कृषी क्षेत्रात भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा आणि वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**पंतप्रधान-सुबियांतो**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी काल नवी दिल्लीत द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा केली. याशिवाय दोन्ही बाजूंमध्ये प्रतिनिधीमंडळ पातळीवरील चर्चाही झाली. काल संध्याकाळी नवी दिल्लीत माध्यमांना माहिती देताना परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पूर्व) जयदीप मुझुमदार म्हणाले की, दोन्ही बाजूंनी व्यापक धोरणात्मक भागीदारी अंतर्गत द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंवर चर्चा केली. संरक्षण, सुरक्षा, नौवहन क्षेत्र, व्यापार आणि गुंतवणूक, कनेक्टिव्हिटी, डिजिटल अर्थव्यवस्था, पर्यटन, आरोग्य आणि दोन्ही देशांमधील लोकांमधील संबंध यासारख्या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी पाच द्विपक्षीय करारांची देवाणघेवाण करण्यात आली. यामध्ये आरोग्य, सागरी संरक्षण आणि सुरक्षा, पारंपारिक औषध, डिजिटल विकास आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या क्षेत्रातील सहकार्यावरील करारांचा समावेश आहे. आज प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रमुख पाहुणे असतील.

**ट्रम्प - बडतर्फी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक सरकारी संस्थांमधून 17 स्वतंत्र निरीक्षक अधिकाऱ्यांना काल काढून टाकलं. या निर्णयामुळं ट्रम्प यांना त्यांच्या निष्ठावंतांना या पदांवर नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पाळत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय तत्काळ लागू झाला, तर संघीय कायद्याचं हे उल्लंघन ठरेल असा दावा माध्यमांमधील वृत्तांमध्ये करण्यात आला आहे. कायद्यानुसार, अध्यक्षांनी अशा बरखास्तीची कारणं काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांना 30 दिवस आधी कळविणं आवश्यक आहे.

**पाक-चीनी नागरिक**

पाकिस्तानमध्ये, चिनी नागरिकांच्या एका गटाने स्थानिक पोलिसांकडून वारंवार होणाऱ्या छळ आणि खंडणीविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सिंध उच्च न्यायालयानं चिनी नागरिकांनी दाखल केलेल्या याचिकेवर परराष्ट्र मंत्रालय आणि इतर संबंधित सरकारी संस्थांना नोटीस बजावली आहे आणि उत्तर मागितलं आहे. सिंध प्रांतातील पोलिसांकडून छळ, खंडणी आणि असंवैधानिक निर्बंधांपासून मुक्तता मिळावी अशी मागणी चिनी नागरिकांनी केली. हजारो चिनी नागरिक कायदेशीररित्या पाकिस्तानात आले होते परंतु त्यांच्याविरुद्ध गैरवर्तन केलं जात होतं. गेल्या सहा ते सात महिन्यांपासून सिंध पोलिस त्यांना सतत छळत आहे, आपण पहिल्यांदा पाकिस्तानात आलो तेव्हा लाच देण्यास भाग पाडण्यात आलं असा दावाही याचिकाकर्त्यांनी केला आहे.

**UPS**

केंद्र सरकारनं एकीकृत निवृत्ती वेतन योजनेच्या म्हणजे UPS च्या अंमलबजावणीची अधिसूचना काढली आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय पेन्शन प्रणाली अंतर्गत पर्याय म्हणून सरकारनं गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये एकीकृत निवृत्ती वेतन योजना सुरू केली होती. ही योजना यावर्षी १ एप्रिलपासून लागू होणार आहे. राष्ट्रीय निवृत्ती योजने अंतर्गत समाविष्ट असलेल्या आणि NPS अंतर्गत हा पर्याय निवडणाऱ्या केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना एकीकृत निवृत्ती वेतन योजना लागू होईल.

**ॲथलेटिक्स**

ॲथलेटिक्समध्ये काल भारताच्या ज्योती याराजीनं तिचा स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडला आणि फ्रान्समधील महिलांच्या 60 मीटर इनडोअर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक जिंकलं. महिलांच्या 100 मीटर अडथळा शर्यतीत आधीच राष्ट्रीय विक्रम करणाऱ्या ज्योती याराजीनं अंतिम सामना जिंकताना 8 पूर्णांक 4 सेकंदांचा वेळ नोंदवली. दरम्यान, भारताचा आणखी एक खेळाडू तेजस शिरसेनं या आठवड्याच्या सुरुवातीला पुरुषांच्या 60 मीटर अडथळा शर्यतीत लक्झेंबर्गमध्ये 7 पूर्णांक 65 सेकंदांची वेळ नोंदवत नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आणि तिसरं स्थान पटकावलं.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेतील दुसऱ्या सामन्यात काल चेन्नई इथं भारतानं इंग्लंडवर दोन गडी राखून रोमांचक विजय मिळवला आणि मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली. इंग्लंडनं प्रथम फलंदाजी करताना 9 बाद 165 धावा केल्या. भारतानं शेवटच्या षटकांपर्यंत आठ गडी गमावून हे लक्ष्य पार केलं. मालिकेतील तिसरा सामना 28 तारखेला राजकोट इथं होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**